## राज्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान पिक विमा योजना लागु

**-एकनाथराव खडसे**

- **पिक विमा संरक्षण हप्त्यापोटी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद**
- **मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन करणार**
- **खरीप हंगामासाठी दोन टक्के, रब्बी हंगामासाठी दीड टक्के आणि व्यापारी पिकांसाठी पाच टक्के दराने विमा हप्ता**

मुंबई,दि.१८ : पंतप्रधान पीक विमा योजनेत बदल करण्यात आला असून कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना तसेच खातेदारांच्या व्यतिरिक्त कुळासांठी ही योजना लागु करण्यात आली आहे. यासाठी पिक विमा संरक्षण हप्त्यापोटी दोन हजार कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली असल्याची माहिती कृषी व फलोत्पादन मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज येथे सांगितले.

मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत श्री.खडसे बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे सचिव डी.के.जैन, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सचिव राजेशकुमार मीना उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, नैसर्गिक आपत्ती, किड-रोग व अन्य कारणांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेली पंतप्रधान पिक विमा योजना यंदाच्या खरीप हंगामापासून राज्यात राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

राज्यात क्षेत्र (मंडळ/मंडळ गट/तालुका) हा घटक धरून राबविण्यात येत असलेली पूर्वीची राष्ट्रीय कृषी विमा योजना केंद्र सरकारने आता बंद केली आहे. त्याऐवजी नव्याने प्रस्तावित केलेली पंतप्रधान पिक विमा योजना तिच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात क्षेत्र (ग्रामपंचायत/मंडळ/तालुका) घटक धरून प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या नवीन योजनेमुळे प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणारी हवामान आधारित पिक विमा योजना खरीप हंगामापासून राबविण्यात येणार नाही.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योजनेंतर्गत विमा क्षेत्र घटक अधिसूचित करणे, पिके अधिसूचित करणे, योजनेसाठी जोखीम स्तर निश्चित करणे, कार्यान्वयन यंत्रणेची नियुक्ती करणे यासह इतर अनुषंगिक बाबींसंदर्भात निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीकडे योजनेची परिणामकारक अंमलबजावणी आणि सनियंत्रणाची जबाबदारी सोपविण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

या योजनेनुसार शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी दोन टक्के, रब्बी हंगामासाठी दीड टक्के आणि व्यापारी पिकांसाठी पाच टक्के दराने विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे. वास्तवदर्शी विमा हप्ता दरातील उर्वरित रक्कम या योजनेत सहभागी होणाऱ्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत समप्रमाणात विमा हप्ता अनुदान म्हणून दिली जाणार आहे.

या योजनेंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती तसेच काढणी पश्चात नुकसान, पिक पेरणीपुर्व/लावणीपुर्व नुकसान भरपाई निश्चित करणे आदींचा समावेश करण्यात आला आहे. तसेच राज्य शासनाकडून पिकाच्या सरासरी उत्पादन प्राप्त झाल्यानंतर तीन आठवडयाच्या आत नुकसान भरपाई निश्चित केली जाणार आहे. ही योजना अकरा विमा कंपन्यांच्या सहाय्याने कार्यन्वयीन करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.